महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २९५ वा | दिनांक : २३/०९/२०२५ | वार : मंगळवार

## दम असेल तर पोलिस बाजूला ठेऊन मैदानात या : नीलेश लंके



**सांगली :** भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांच्याविषयी बोलताना वादग्रस्त विधान केले होते. याच्या निषेधार्थ सांगलीत शरद पवार गटाकडून संस्कृती बचाव मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चात पक्षाचे सर्वच नेते उपस्थित होते. यावेळी बोलताना खासदार नीलेश लंके यांनी पडळकरांना थेट इशारा दिला आहे. दम असेल तर पोलिस बाजूला ठेऊन मैदानात या. दूध का दूध, पाणी का पाणी होऊ द्या, असे आव्हान लंके यांनी पडळकरांना केले आहे.

खासदार नीलेश लंके म्हणाले, याचा आका एसीत बसतो, आकालाच धडा शिकवायला हवा. एकदा पोलिस बाजूला ठेवा, दम आहे तर एकदा रणांगणात या. सरकारमधील लोकांकडे विकासाचा अजेंडा नाही म्हणून असल्या गोष्टी पुढे केल्या जातात. वाचाळवीर आधी दोन पोलिस घेऊन फिरत होते, आता चार पोलिस घेऊन फिरत आहेत. दम असेल तर पोलिस बाजूला ठेवून मैदानात या. दूध का दूध, पाणी का पाणी होऊ द्या, असे आव्हान केले आहे.

या मोर्चात बोलताना आमदार रोहित पवारांनी देखील गोपीचंद पडळकर तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर देखील टीका केली आहे. ते म्हणाले, गोपीचंद पडळकर म्हणजे बेंटेक्सचेच सोने आहे. हा विषय तालुका, जिल्ह्याचा नाही तर महाराष्ट्राचा आहे, महाराष्ट्र धर्माचा आहे. आम्हीही खालच्या पातळीवर जाऊन बोलू शकतो, पण आम्ही शब्दांची पातळी जपतो. काही लोक स्वतःला चाणक्य समजतात, या नेत्यांनी काही दिवसांपूर्वी जाहिराती दिल्या, निनावी जाहिराती दिल्या. गलिच्छ राजकारण महाराष्ट्रात फडणवीस यांनी आणले आहे, अशी टीका पवारांनी केली आहे.

पुढे बोलताना रोहित पवार म्हणाले, महाराष्ट्रातील महामानवांनी आम्हाला विचार दिला, आपण महामानवांची जयंती साजरी करतो पण त्यांच्या विचारांचे अनुकरण करत नाही. बहुजन समाजाच्या नेत्याचा वापर पवार कुटुंबावर, मोठ्या नेत्यावर बोलण्यासाठी केला जातोय. पवार कुटुंबाला बोलतात, पाटील कुटुंबाला बोलतात, बहुजन समाजाच्या नेत्यांना कळत नाही की यांचा उपयोग करून घेतला जात आहे. या लोकांना बोलून उपयोग नाही, यांचा बोलवता धनी कोण? त्यांना बोलले पाहिजे. आमच्यावर ईडीची नाहीतर दुसरी कोणतीही कारवाई करा, आम्ही घाबरणार नाही. निवडणूक आली की हे लोक समाजासमाजात तेढ निर्माण करतात. लोकसभेत हिंदू-मुस्लिम केले, विधानसभेत मराठा ओबीसी केले. आता मुंबईत मराठी-अमराठी करत आहेत.

## पुणे पोलिसांकडून गुंडांची धरपकड

**पुणे :** शहरातील गुन्हेगारी टोळ्यांचा वाढता प्रभाव कमी करण्यासाठी पुणे पोलिसांनी मोठी मोहीम हाती घेतली आहे. विशेष म्हणजे, पोलिसांच्या परिमंडळ १ अंतर्गत एकाच दिवशी ४३ गुन्हेगारांना अटक करून त्यांना तुरुंगात पाठवण्यात आले आहे. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या उद्देशाने ही कारवाई करण्यात आली असून, यामुळे गुन्हेगारी वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

गेल्या काही आठवड्यांपासून पुण्यात गुन्हेगारी टोळ्यांच्या हालचाली वाढल्या होत्या. गोळीबार, वाहनांची तोडफोड आणि हल्ल्यांच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे दिसून आले होते. विशेषतः नानापेठ भागात कोमकर-आंदेकर टोळीतील सदस्यांमध्ये झालेल्या गोळीबाराच्या घटनेमुळे शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या गंभीर घटनेनंतर पुणे पोलिसांनी गुन्हेगारी टोळ्यांविरोधात कठोर पावले उचलण्याचे ठरवले. ही कारवाई त्याच कठोर भूमिकेचा भाग असल्याचे मानले जात आहे.

परिमंडळ 1 चे पोलीस उपायुक्त कृषिकेश रावले यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही मोठी कारवाई केली आहे. अवघ्या 24 तासांत पोलिसांनी 43 सराईत गुन्हेगारांना अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्यांमध्ये अनेकजण कुख्यात आंदेकर टोळीचे सदस्य आहेत. या आरोपींवर खून, खुनाचा प्रयत्न (कलम 307), दारूबंदी कायदा, शस्त्रबंदी कायदा आणि इतर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. नवरात्रीच्या काळात कोणत्याही हिंसक घटना घडू नयेत, यासाठी पोलीस पूर्णपणे 'अॅक्शन मोड'मध्ये आले आहेत. शहरातील वाढती गुन्हेगारी आणि विशेषतः टोळ्यांचे नेटवर्क मोडून काढणे, हे या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

गेल्या काही दिवसांपूर्वीच कुख्यात गुंड निलेश घायवळ याच्या टोळीने भररस्त्यात प्रकाश धुमाळ यांच्यावर गोळीबार केला होता. फक्त गाडीला बाजू न दिल्यासारख्या क्षुल्लक कारणावरून झालेला हा हल्ला अत्यंत गंभीर होता आणि त्यामुळे शहरात खळबळ उडाली होती. त्यानंतर याच टोळीतील गुंडांनी 'आम्ही इथले भाई आहोत' असे म्हणत सागर कॉलनी परिसरात वैभव साठे नावाच्या नागरिकावर कोयत्याने हल्ला करून दहशत माजवण्याचा प्रयत्न केला. या घटनांमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप पसरला होता आणि त्यानंतरच पोलिसांनी टोळ्यांविरोधात कठोर पाऊले उचलली आहेत.

## जयंत पाटील गप्प बसले पण मी गप्प बसणार नाही : जितेंद्र आव्हाड

**सांगली :** भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांच्याविषयी बोलताना वादग्रस्त विधान केले होते. त्यानंतर गोपीचंद पडळकर यांच्यावर विरोधकांनी हल्लाबोल केला आहे. परंतु, जयंत पाटील यांनी यावर अद्याप कुठलीही प्रतिक्रिया दिलेली नाही. यावर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी प्रतिक्रिया देत म्हटले की जयंत पाटील गप्प बसले असतील पण मी गप्प बसणार नाही, असा इशारा पडळकर यांना दिला आहे.

सांगली येथे राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने संस्कृती बचाव मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चात पक्षाचे सर्वच नेते उपस्थित होते. जितेंद्र आव्हाड यांनी माध्यमांशी बोलताना गोपीचंद पडळकर यांच्यावर टीका केली आहे. असेच बोलत रहा, आपल्या ओरिजनल संस्कृतीची महाराष्ट्राला ओळख करून द्या, आपण कसे आहोत हे महाराष्ट्राला कळले पाहिजे. आपण ओरिजनल कसे आहोत हे सर्वांना समजू द्या, असा खोचक सल्ला आव्हाड यांनी पडळकर यांना दिला आहे. तसेच जयंत पाटील गप्प बसले असतील पण मी गप्प बसणार नाही, असा इशाराही जितेंद्र आव्हाड यांनी गोपीचंद पडळकर यांना दिला आहे.

विधीमंडळात मंगळसूत्र चोर म्हणून का ओरडलो याबाबतचा खुलासा जितेंद्र आव्हाड यांनी यावेळी बोलताना केला, ते म्हणाले, मी विधीमंडळात आल्यानंतर पडळकर यांनी हा बघा आला लांड्याचा, असा शब्द उच्चार माझ्याबाबत केला. म्हणून मी त्या दिवशी जे बोलायचे ते बोललो आणि त्यानंतर माझ्यावर गाडी घालण्याचा प्रयत्न केला. मात्र, या घटनेत दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या भावाला ती गाडी लागली, अशी माहिती आव्हाड यांनी दिली आहे.

दरम्यान, रविवारी झालेल्या भारत पाकिस्तान क्रिकेट सामन्यात पाकिस्तानी खेळाडूने बंदुकीच्या गोळ्या झाडल्याची अॅक्शन करत ५० धावा पूर्ण केल्याचे सेलिब्रेशन केले. यावर प्रतिक्रिया देताना जितेंद्र आव्हाड यांनी मोदी सरकारवर टीका केली आहे. ते म्हणाले, खेळवा मॅच अजून, दहशतवाद्यांकडून मारले गेलेल्यांच्या कुटुंबीयांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा हा प्रकार असल्याची टीका आव्हाड यांनी केली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २२ सप्टेंबर २०२५


## कालिकादेवी विद्यालय बुद्धिबळ स्पर्धेत तालुक्यातून अव्वल



**शिरूर (कासार) :** 'महाराष्ट्र शासनाच्या' शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे. यांच्या अधिनस्त जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद गटशिक्षण कार्यालय, शिरूर (का.)ता.शिरूर (का.)जि.बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेचं आयोजन करण्यात आले होते.

ही शालेय बुद्धिबळ स्पर्धा वयोगट १७ व १९ वर्षाखालील मुलांसाठी होती.या स्पर्धेमध्ये कालिकादेवी विद्यालयाचे मा.प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या मार्गदर्शनानुसार चि.शोयब शौकत आत्तार या विद्यार्थ्याने १७ वर्ष वयोगटात प्रथम क्रमांक पटकावला.तर १९ वर्ष वयोगटात अनुक्रमे कु.सानिका शरद शिंदे व कु.राणी राजेंद्र शिंदे यांनी प्रथम क्रमांक मिळविला आहे.

या जिंकलेल्या स्पर्धकांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.या शालेय बुद्धिबळ स्पर्धेत तालुक्यातील अनेक नामांकित शाळेने सहभाग घेतला होता.

मात्र कालिकादेवी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला आहे. विद्यालयामधील,क्रीडा शिक्षक श्री रविंद्र बडे व प्रा.बाळासाहेब खटाणे यांनी मुलांच्या बुद्धिबळ स्पर्धेची तयारी अतिशय कौशल्याने करून घेतली होती.यामुळे विद्यालयातील विद्यार्थ्यांनी दोन्ही गटात तालुकास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवून तालुक्यामध्ये कालिकादेवी विद्यालयाचे नाव लौकिक केले आहे.

यामुळे कालिकादेवी विद्यालयातील तिन्ही विद्यार्थी स्पर्धकांना जिल्हास्तरीय स्पर्धेत जाण्याचा मान मिळाला आहे.यामुळे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव मा.जयदत्त (अण्णा) क्षीरसागर, मा.रोहीत (दादा) क्षीरसागर, प्रशासन अधिकारी मा.डॉ.राजू मचाले,सहाय्यक प्रशासन अधिकारी मा.योगेश पवार, कार्यवाहक मा.एम.ए.राऊत, प्राचार्य केशव भांगे साहेब,उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने, पर्यवेक्षक जनार्दन काळे व सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, परिसरातील क्रीडाप्रेमी व सर्व विद्यार्थी यांनी विद्यालयाचे आणि विजेत्यांचे अभिनंदन केले आहे.

## कलाशिक्षक सलीम आत्तार यांना रोटरी क्लब औरंगाबाद मेट्रो तर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान



**कन्नड (प्रतिनीधी) :** शैक्षणिक, सांस्कृतिक, कलात्मक तसेच पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदानाबद्दल रोटरी क्लब औरंगाबाद मेट्रो या संस्थेतर्फे कलाशिक्षक सलीम आत्तार यांना “आदर्श शिक्षक पुरस्कार” प्रदान करण्यात आला.

यांनी गेल्या अनेक वर्षांपासून विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी सतत कार्य केले आहे. कोविड-१९ च्या कठीण काळात विद्यार्थ्यांसाठी कलेचे ऑनलाईन व्यासपीठ उपलब्ध करून दिल्यामुळे त्यांच्या मानसिक स्वास्थ्य जपण्याचे मोलाचे कार्य त्यांनी साध्य केले.

पर्यावरण संवर्धन, प्लास्टिकमुक्त उपक्रम, ऊर्जा बचत, मतदार जनजागृती यांसारख्या विविध सामाजिक कार्यक्रमांचे सातत्याने आयोजन करून त्यांनी समाजात जनजागृती घडवली. विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला चालना देण्यासाठी विविध चित्रकला स्पर्धा आयोजित करून तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर अनेक विद्यार्थ्यांना पारितोषिके मिळवून दिली. पर्यावरणपूरक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव दृढ केली.

गेल्या सोळा वर्षांपासून एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट परीक्षेत शंभर टक्के निकालाची परंपरा टिकवून ठेवणे हे त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य आहे.या सर्व उत्कृष्ट कार्याबद्दल रोटरी क्लब औरंगाबाद मेट्रो तर्फे रोटरी क्लबचे अध्यक्ष वंदना वाकचौरे सचिव प्रवीण शेंडे यांच्या हस्ते सलीम आत्तार यांना आदर्श कलाशिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रशालेचे मुख्याध्यापक भाऊसाहेब घोलप शिक्षक दिलीप महाजन, कुलभुषण व्यवहारे, राजेंद्र शिंपी, नुतन पवार , शाम खोसरे, भास्कर भामरे, राधेशाम शर्मा, स्वप्नील गांगुर्डे, गणेश बल्हाळ, रविंद्र ठाकरे, किसनाबाई गोरे, सविता कुंटे यांनी अभिनंदन केले






## संतोष दराडे यांना उत्कृष्ट युवा कार्यकर्ता राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर



**बुलढाणा (महेश मुंढे) :** सिनखेडराजा तालुक्यातील हिवरखेड पूर्णा येथील सामाजिक कार्यकर्ते संतोष अंबादास दराडे यांना यावर्षीचा दैनिक भारत संग्राम आयोजित क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त तसेच अर्जुनराव गवळी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार सोहळयामध्ये उत्कृष्ट युवा राज्यस्तरीय कार्यकर्ता पुरस्कार घोषित झाला आहे.

सदर संतोष दराडे यांनी शेतकरी कष्टकरी विद्यार्थी यांच्या करता आवाज उठवला आहे, नुकतेच त्यांनी विद्यार्थ्यांसाठी गावांमध्ये एसटी बस सेवा सुरू केली आहे श्रावण बाळ निराधार योजना अशा अनेक योजनेसाठी ते आग्रही असतात.

याच कार्याची दखल घेत कार्यक्रमाचे मुख्य आयोजक सचिन खंडारे व निवड समितीचे अध्यक्ष विकास सुखदाने यांनी पत्राद्वारे त्यांची नियुक्ती केली आहे, सदर या नियुक्ती बद्दल संतोष दराडे यांच्यावर सर्व स्तरांमधून अभिनंदनचा वर्षाव होत आहे, साखरखेर्डा येथे लवकरच भव्य दिव्य कार्यक्रमांमध्ये सदर पुरस्कार वितरित होणार आहेत

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २२ सप्टेंबर २०२५


## नांदगाव तालुक्यात बंजारा धनगर व इतर समाजाला एसटी प्रवर्गात आरक्षण न देण्यासाठी आंदोलन



**खुलताबाद (सनिराम गावंडे)** : नांदगाव तालुक्यातील सकल आदिवासी बांधवांनी दिनांक १८/०९/२०२५ रोजी तहसीलदार यांना निवेदन दिले आहे या निवेदनात म्हटले आहे की बंजारा धनगर समाजाला तसेच इतर कोणत्याच समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्यात येऊ नये या मागणीसाठी २३ सप्टेंबर २०२५ रोजी नांदगाव तालुक्यातील सकल आदिवासी समाजाच्या वतीने हुतात्मा चौक ते रेल्वे भुयारी मार्ग ते नवीन तहसील कार्यालयापर्यंत मोर्चा काढण्यात येणार आहे.

आदिवासी क्रांतिकारक राया ठाकर फाउंडेशन महाराष्ट्र राज्य तालुका संघटक मधुकर गावंडे तालुका सचिव रवींद्र फोडसे व जनार्धन मेंगाळ रमेश मेंगाळ एकलव्य संघटनेचे कार्यकर्ते बाळाभाऊ मोरे सुनिल सोनवने कैलास बर्डे तसेच आदिम सेना कार्यकर्ते गजानन भोई अरूण सापटे सुनिल डोळे कातकरी संघटना कार्यकर्ते संदिप हिलम तसेच नांदगाव तालुक्यातील सकल आदिवासी बांधव या मोर्चात हजर राहणार आहे अशी तालुका अध्यक्ष मधुकर मेंगाळ यांनी माहिती दिली आहे. सकाळी ११ वाजता हुतात्मा चौक ते तहसील कार्यालयात हा मोर्चा काढण्यात येणार आहे.

# आज श्रीकृष्ण महाविद्यालय गुंजोटीत आविष्कार स्पर्धा २०२५

**गुंजोटी (प्रा. नागसेन कांबळे)** : उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयात आज दिनांक २३ सप्टेंबर २०२५ वार मंगळवार रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व श्रीकृष्ण महाविद्यालय गुंजोटी यांच्या संयुक्त विद्यमाने नवोपक्रम व संशोधनातील जिल्हास्तरीय आविष्कार २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या उद्घाटनासाठी डॉ.राजीव मराठे हे येत असून ते डाळिंब संशोधन केंद्र सोलापूर येथे संचालक म्हणून कार्यरत आहेत.या आविष्कार स्पर्धेच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव डॉ.दामोदर पतंगे हे उपस्थित राहणार आहेत.

तर विशेष उपस्थिती म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ.कैलास अंभुरे ,आविष्कार चे विद्यापीठ समन्वयक डॉ.भास्कर साठे,युनिक तथा आविष्कारचे संचालक डॉ.प्रवीण यण्णावार ,श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे संचालक डॉ.सागर पतंगे हे आवर्जून उपस्थित राहणार आहेत.आविष्कार स्पर्धेतून संशोधन संस्कृतीला चालना मिळावीविद्यार्थ्यांमध्ये नाविन्यपूर्ण कल्पना व संशोधन वृत्ती वाढीस लागून ती विकसित करण्यासाठी,विद्यार्थ्यांच्या संशोधन वृतीला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र शासन राजभवनाच्या वतीने २००६ पासून "आविष्कार" ही संशोधन प्रकल्प स्पर्धा सुरू केली आहे.आतापर्यंत राज्यातील महाविद्यालये व विद्यापीठांच्या शैक्षणिक आयुष्यात ही स्पर्धाअत्यंत महत्त्वाचा उपक्रम ठरली आहे.

आजपावेतो २०० च्या वर विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत आपली नाव नोंदवली आहेत.नावनोंदवण्याची मुदत आता संपली असून ऐनवेळी कोणत्याही विद्यार्थ्यास स्पर्धेसाठी प्रवेश नोंदणी करता येणार नाही. श्रीकृष्ण महाविद्यालय गुंजोटी यांना पालिल्यांदाच यजमानपदाचा बहुमान मिळाला आहे. चार जिल्ह्यातील सहा शाखेतील विजेते स्पर्धक केंद्रीय आविष्कार स्पर्धेत सहभागी होतील.

प्रत्येक जिल्ह्यातून निवडण्यात आलेले टॉप थ्री संघ हे केंद्रीय आविष्कार स्पर्धेत सहभागी होणार आहेत.डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसरात येत्या ३ आणि ४ ऑक्टोबर रोजी ही स्पर्धा होणार आहे.जिल्हास्तरावर केवळ पदवीचा आविष्कार होईल.या स्पर्धेत नवोन्मेष, तंत्रज्ञान, समाजोपयोगी शोध व पर्यावरण संवर्धन यांसारख्या विषयांवर आज जवळपास २१९ विद्यार्थी आपले संशोधन प्रकल्प सादर करणार आहेत.

"विद्यार्थ्यांमध्ये संशोधन संस्कृती रुजविणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे. आविष्कार स्पर्धा ही त्या दिशेने टाकलेले एक भक्कम पाऊल आहे,असे म्हणावयास हरकत नाही.आलेल्या संशोधन प्रकल्पातून २५ स्पर्धकांची केंद्रीय आविष्कार स्पर्धेसाठी निवड करण्यात येणार असून आजच सा.पाच वाजता समारोप समारंभात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहेत. कार्यक्रम वेळेवर सुरू होणार असून संबंधितांनी वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड यांनी केले आहे.

## जागतिक मानसिक आरोग्य सप्ताह मानसिक आरोग्य केंद्र पडेगाव येथे राबविण्यात येत आहे




**पडेगाव (प्रा. शिवाजी गायकवाड)** : पडेगाव येथील डॉ.ए. ए. कादरी यांच्या मानसिक आरोग्यकेंद्रात यावर्षीचे आरोग्य संघटनेच्या घोषवाक्य नुसार समाज मानसिक आरोग्य कडे एकत्रितपणे वाटचाल या उपक्रमाचे उपदेश म्हणजे सामूहिक कृती, साहनुभूती आणि समावेशकता यांच्या माध्यमातून चांगल्या मानसिक आरोग्य कडे वाटचलं समाजातील विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या नागरिक महिलांच्या आरोग्य बद्दल जनजागृती निर्माण करून या उपक्रमामध्ये शहरातील विविध शाळा ,महाविद्यालय, संस्था, प्रतिष्ठाने, सरकारी कार्यल्याचे प्रतिनिधी यात सहभागी होणार आहे

डॉ. ए. ए. कादरी व डॉ मेहराज कादरी यांनी समाजसेवा म्हणून मानसिक आजरावर कसे मात करता येइल यासाठी सप्ताहभर विविध कार्यक्रम द्वारे जनजागृती करून मानसिक आजर बद्दल माहिती देतील व यानिमित्त विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत यात २२सप्टेंबर वादविवाद स्पर्धा , २३ सप्टेंबर पोस्टर स्पर्धा, २४लघुनाट्य स्पर्धा, २५ भाषण स्पर्धा निबन्ध स्पर्धा घेण्यात येणार आहे विजेत्यांना समृती चिन्ह प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २२ सप्टेंबर २०२५


## अग्रसेन महाराज जयंती निमित्त कन्नड शहरात भव्य शोभायात्रा संपन्न



**कन्नड (अरुण थोरात):** श्री छत्रपती अग्रसेन महाराज जयंतीच्या पावन अवसर निमित्ताने नगरात भव्य शोभायात्रा काढण्यात आली. समाजबंधूंनी उत्साहाने सहभाग नोंदवत नगरभर आनंदोत्सवाचे वातावरण निर्माण केले. कार्यक्रमांतर्गत श्री छत्रपति महाराज अग्रसेन उद्यान येथे "१ रुपया १ वीट" चा स्तंभचा पूजन करण्यात आले.

प्रसंगी मुख्य अतिथी भाजपा नेते व उद्योजक मनोज भाऊ पवार यांचे समाजतर्फे स्वागत करण्यात आले.या प्रसंगी रूपेश भारुका ने अग्रवाल युवा मंच व सकल अग्रवाल समाजाच्या वतिने मनोज भाऊ पवार यांचे मन:पूर्वक आभार मानत त्यांच्या सातत्यपूर्ण सहकार्य व मार्गदर्शनाची प्रशंसा केली.

या वेळी भाजपा जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, भाजपा नेते व उद्योजक मनोज केशवराव पवार, उर्मिला ताई पवार, मंडळाध्यक्ष सुनील भाऊ पवार अग्रवाल युवा मंच चे रुपेश भारुका, रोहित पिरथानी, गोविंद भारुका, संगेश भारुका, जिल्हाध्यक्ष भाजपा व्यापारी आघाडी संभाजीनगर प्रशांत अग्रवाल, विकास भारुका, विजय अग्रवाल, करण भारुका, अरुण भारुका, तेजस भारुका, संजय वर्मा, सुशांत भारुका, समित भारुका, एड.महेश भारुका, प्रदीप भारुका, संजय भारुका, पंकज भारुका, सुभाष भारुका, अनिल पिरथानी व अग्रवाल महिला मंडलची अर्चना ओ. भारुका, माधुरी भारुका, प्रणिता भारुका, अंजू पिरथानी, कीर्ति भारुका, सुनंदा भारुका, शोभा भारुका, अर्चना भारुका, राधा अग्रवाल , वैशाली अग्रवाल, शीतल केडिया, दीप्ति अग्रवाल, मोनिका भारुका व भाजपाचे कैलास भाऊ जाधव, कुलकर्णी भाऊ, युवा मोर्चा अध्यक्ष पवन भाऊ ठाकूर, मनोज भाऊ देशमुख, शंकर भाऊ राऊत, संदीप भाऊ नरवडे, संदीप भाऊ ऊजागरे, इम्रान भाई शेख, अमोल भाऊ सोनवणे, रविभाऊ भालेराव, संदीप कांबळे, नवनाथ भाऊ साळवे, दिलीप आप्पा सोनवणे, अशोक भाऊ वाहुळ, पंचायत समिती माजी उपसभापती काकासाहेब तायडे, मनोज भाऊ देशमुख, समस्त समाज बंदू उपस्थित होते.

## ५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी लातूरच्या वार्षिक प्रशिक्षणास सुरुवात



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवालय लातूर येथे 53 महाराष्ट्र बटालियन एनसीसी लातूरच्या कम्बाईन वार्षिक प्रशिक्षण शिबिरास प्रारंभ झाला असून सदर शिबीर 21 ते ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत चालणार आहे.या कॅम्पचे कॅम्प कमांडंट कर्नल संतोष नौगण ,डेप्युटी कॅम्प कमांडंट वाय.बी.सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली एनसीसी कॅडेटना विविध प्रकारचे सैनिकी प्रशिक्षण दिले जाणार आहेत.

या वार्षिक प्रशिक्षणाच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना कर्नल संतोष नौगण यांनी एनसीसी कॅडेटना एकता व अनुशासन याचे पालन करून राष्ट्र निर्मितीसाठी एनसीसी कॅडेट यांनी आपले योगदान द्यावे असे आवाहन केले. या कॅम्पसाठी सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवालय चे प्रशासक सचिन जांबुतकर व देवस्थान चे विश्वस्त यांनी कॅम्प साठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे सर्वप्रथम आभार व्यक्त केले. या कॅम्प चा मुख्य उद्देश २६ जानेवारी २०२६ मध्ये होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या परेडसाठी एनसीसी कॅडेट्स निवड केली जाणार आहे .

या एनसीसी कॅडेट्सना ड्रिल ,फायरिंग,सांस्कृतिक कार्यक्रम, फ्लॅग एरिया, खेळ , बेस्ट कॅडेट इत्यादी सराव घेतला जाणार आहे .या कॅम्प दरम्यान कॅडेट्सना सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन त्याचबरोबर विविध खेळाचे आयोजन केले आहे. या कॅम्पमध्ये लातूर धाराशिव,धुळे अमळनेर, अहिल्यानगर, नांदेड, छत्रपती संभाजीनगर असे एकूण ०९ बटालियन च्या शाळा व महाविद्यालयातील जवळपास 450 एनसीसी कॅडेट सहभागी झाले आहेत.

या कॅम्पच्या यशस्वीतेसाठी कॅप्टन डॉ चिट्टमपल्ले ज्ञानेश्वर,सुभेदार मेजर शंभू सिंग, चिफ ऑफिसर महावीर काळे,लेफ्टनंट के .एम. क्षिरसागर,नमनगे जगदीश ,विलास राऊत ,सुभेदार हरेंदर सिंग, सू. संजय चिकने, सू.देशराज सिंह , सू.उत्तम पाटील,ना.सुभेदार बाजीराव पाटील,बीएचएम शिवशंकर निकम तसेच कार्यालयीन हेड क्लर्क घोगरे बी .व्ही.व पवार आर आर हे परिश्रम घेत आहेत .

## शिवाजी भिकणराव चंदेल यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा सचिव पदी निवड




**दौलताबाद (जावेद अहेमद)** : शिवाजी भिकणराव चंदेल यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा सचिव पदी निवडराष्ट्रीय अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या छत्रपती संभाजीनगर पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते टाकळी चे शिवाजी चंदेल यांची जिल्हा सचिव पदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे जिल्हाध्यक्ष सतीश चव्हाण यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.यनिवडी बद्दल त्यांना गणेश काजवे, दिलीप बनकर, रमेश विचित, साहेबराव बढेकर, लक्ष्मण चंदेल, त्र्यबकेश्वर बनगे, अमोल लिंगायत, जनार्धन गवळी, गणेश शेलार, कॉ राम बाहेती,एस आर फुलारे, अतुल शेलार, अशोक गायकवाड, अशोक शेरकर, अशोक कर्डीले, भगवान बनगे, डॉ सचिन शेलार, भगवान बढेकर, शामलाल बढेकर, संतोष मोरे, मनेश गाजरे आदींनी शुभेच्छा दिली आहे


Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुर्वणसंधी

B.A.(मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २२ सप्टेंबर २०२५


# जय देवी जननी

आराधना तुझी करुनी माता,
शक्ती तुझी अमर अनंता ।
कृपादृष्टी धर माता भवानी,
तुझ्याविण जीवन अपूर्णता ॥ ध्रु॥

ढोल-ताशांचा निनाद देवीचा जयघोष
सिंहावर आरूढ माता करते दुष्टांचा नाश!
जय भवानी, जय दुर्गा, जगदंबा जननी
नवरात्राच्या गजराने... धरणी माई दुमदुमली!

कधी दुर्गा, कधी काली कधी सरस्वती माता
ज्ञान-शक्ती, संपत्ती देते माया करी भक्ता
शेतकरी, शेतमजूर सारे गातात तुझं नाव
तुझ्या कृपेने देवी खुलतो जगाचा भाव!

ढोलकीच्या तालावर थिरकती भक्तगण,
गल्लो-गल्ली गाजतो देवीचा जयघोष.
हृदयात उमलतो नवरात्रीचा आनंद,
तुझ्या चरणी माता वाहू प्रीतीचा नंद!

अंधार हरपुनी उजेड देणे येते माता
भक्त नवरात्री सुख शांतीचे गीत गाता
मुलींच्या हास्यात तुझं रूप दिसे,
माणुसकीच्या वाटेवर माता तुज साठी बसे!


**कवी**
**संदिप नानासाहेब वाकडे**
रा.खेडा ता.कन्नड
जी. छ. संभाजीनगर
मो. ९७६६९९२७७६


## सामाजिक शास्त्रातील संशोधन आणि अकॅडमिक रायटिंग या दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचा समारोप




**छत्रपती संभाजीनगर :** मानवी समाजाच्या प्रगतीसाठी वैज्ञानिक विचारांचा आग्रह धरणे आवश्यक असून ज्ञानाधिष्ठित समाजात हाच विचारांचा वारसा जिवंत असला पाहिजे. वैज्ञानिक विचाराद्वारेच मानवाने प्रगती केली असून हा विचार आपण जपला नाही तर समाज प्रगतीपासून कोसो दूर राहील. विविध विचारातील संघर्षातून नवे वैज्ञानिक विचार अस्तित्वात येतात आणि त्याचे समाजात स्वागत झाले पाहिजे.

यासाठी दर्जेदार संशोधनाचा सातत्याने आग्रह केला पाहिजे. याकरिता सतत विचार करा, भरपूर वाचा, लिहा, प्रतिक्रिया द्या आणि संवाद साधा. असे आवाहन जे. एन.यू. नवी दिल्ली येथील सामाजिक शास्त्रे विभागाचे अधिष्ठाता आणि विचारवंत डॉ.विवेक कुमार यांनी केले.स. भु. कला व वाणिज्य महाविद्यालय आणि भारतीय सामाजिक संस्था, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "सामाजिक शास्त्रातील संशोधन आणि अकॅडमिक रायटिंग" या दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते.

स. भु. शिक्षण संस्थेच्या गोविंदभाई श्रॉफ ललित कला अकादमी सभागृहात ही कार्यशाळा संपन्न झाली.यावेळी डॉ. बा. आं. म. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रशांत अमृतकर म्हणाले की, "बौद्धिक प्रामाणिकपणा ही उत्तम संशोधनाची गरज असते. वर्तमान कृत्रिम बुद्धिमत्तेच्या काळात मानवी मूल्ये आणि सर्जनशीलतेला आपण प्राधान्य दिले पाहिजे. गुणात्मक संशोधनावर आपण नेहमी भर दिला पाहिजे.

लखनऊचे प्रा. डॉ. विनोद चंद्रा म्हणाले, "संशोधन ही अखंड प्रक्रिया असून सामाजिक प्रगल्भतेसाठी ती आवश्यक आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन अंगी बाळगणारा समाज आपण उभा केला पाहिजे. अध्यक्षीय भाषणात स.भु. शिक्षण संस्थेचे सरचिटणीस डॉ. श्रीरंग देशपांडे म्हणाले की, "समाजशास्त्र हे विविध विषयांशी समन्वय साधणारे शास्त्र आहे. 'माणूस असा का वागतो?' हे कोडे उलगडत नाही तोपर्यंत समाजशास्त्राचे अध्ययन सुरू राहील.

आपल्या सामाजिक प्रश्नाचे संशोधन भारतीय दृष्टिकोनातून होणे आवश्यक आहे."कार्यशाळेचा अहवाल संयोजक डॉ. संदीप चौधरी यांनी वाचला. यावेळी डॉ. बी. वाय. क्षीरसागर, डॉ. रश्मी बोरीकर, ज्ञानप्रकाश मोदानी, डॉ. गजानन सानप, डॉ. जगदीश खैरनार, डॉ. आनंद चौधरी यांचीही उपस्थिती होती. पाहुण्यांचा परिचय प्रा. सलोनी गंगवाल यांनी करून दिला तर सूत्रसंचालन डॉ.अमृता वाकळे यांनी केले तर आभार प्राचार्य डॉ. विवेक मिरगणे यांनी मानले.या कार्यशाळेत जवळपास दोनशे संशोधक विद्यार्थी सहभागी झाले होते.

## नारायण पाटील ढगे यांची भारतीय जनता पार्टी गंगापूर तालुका उपाध्यक्षपदी निवड



**दौलताबाद (जावेद अहेमद)** : नारायण पाटील ढगे यांची भारतीय जनता पार्टी गंगापूर तालुका उपाध्यक्षपदी निवडआमदार प्रशांत बंब यांच्या मार्गदर्शनाखाली जांभाळा तालुका गंगापूर येथील नारायण ढगे पाटील यांची गंगापूर तालुका उपाध्यक्ष पदी निवड केली.

निवड झाल्याबद्दल गावकरी व परिसरातील नागरिकातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शिवनाथ मालकर, तंटामुक्ती अध्यक्ष सुशीलाबाई गेहलोत, के. डी. रावते, रवी चव्हाण, दीपक पाटील,संतोष बारगळ, हबीब शेख विकास गेलोत, ज्ञानेश्वर जाधव, संतोष ढगे, मिथुन गेलोत, नागेश पवार, नंदु जाधव, नईम शेख, विकास गेलोत, विवेक दाणे,किरण दाणे, बाळू बनकर, गणेश दाणे आदींनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २२ सप्टेंबर २०२५

# १३३ वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न





**छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी)** : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन, नालंदा बुद्ध विहार समिती व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने, नालंदा बुद्ध विहार, संघर्ष नगर, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे " आपल्या धार्मिक, सामाजिक व राजकीय आयुष्याचा पाया बुद्धिवाद हाच असला पाहिजे." या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या 81 व्या वर्धापन दिनानिमित्त सदरील प्रासंगिक विषयावर 133 वी वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा 21 सप्टेंबर 2025 ला संपन्न झाली. फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, धार्मिक क्षेत्रात प्रगती करायची असेल तर धम्माचे आचरण केले पाहिजे.

बुद्धिस्ट रिलिजियस सेमिनरी प्रमाणे चर्चा करून सामान्य जनतेला मानवतावादाकडे वळविले पाहिजे. सामाजिक दृष्ट्या विचार करता देशात भारताचे संविधानानुसार समाज तयार करण्यासाठी सर्व नागरिकांना भारताचे संविधान समजावून सांगण्यासाठी जनजागृती अभियान राबविले पाहिजे. परिणामी सारा भारत बौद्धमय करण्याचे स्वप्न साकार करता येईल. तसेच राजकीय दृष्ट्या विचार करता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अपेक्षेप्रमाणे शासनकर्ती जमात व्हायचे असेल तर जनतेचे जनमत तयार करण्यासाठी ट्रेनिंग स्कूल फॉर एंट्रन्स टू पॉलिटिक्स चालविले पाहिजे जेणेकरून प्रशिक्षित कार्यकर्त्यांची फळी निर्माण होईल.

ज्यांच्यामार्फत समाज जीवनात विचारधारेचा प्रचार व प्रसार केला जाऊ शकेल. करिता या आठवड्यात बौद्धाचार्याचे जनक भैय्यासाहेब यशवंतराव आंबेडकर व राष्ट्रसंत नारायण गुरु यांच्या स्मृतिदिनानिमित्त आणि कॉम्रेड शरद पाटील व पेरियार ई. व्ही. रामासामी नायकर यांच्या जयंतीनिमित्त आदर्श महापुरुषांच्या विचारांची मशागत केली पाहिजे. म्हणजे आदर्श समाज तयार होईल. परिणामी परिवर्तनवादी आंदोलनाला वेगाने गतिमान करता येईल.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना सविता अभ्यंकर म्हणाल्या की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिलासाठी मंत्रीपदाचा राजीनामा दिला होता, हे महिलांनी लक्ष्यात घेतले पाहिजे. राजकीय दृष्या विचार करतात निवडणूक प्रक्रियेत आपण कुठे आहोत? धार्मिक दृष्ट्या विचार करता फार कमी विहारे सक्रिय आहेत. त्यात तरुणांचा सहभाग नसल्यासारखा असतो. याप्रसंगी विश्राम राऊत म्हणाले की, बुद्ध फुले शाहू आंबेडकरांचे विचार हे त्रिकालबाधित सत्य आहे. ते स्वीकारण्यासाठी बुद्धीवाद वापरला नाही तर आपण लयास जाणार आहोत.

सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला व पुष्प अर्पण करण्यात आले तर नालंदा बुद्ध विहाराच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. भंते कुलिनपुत्र वेस्सभुज्जी थेरो यांनी कार्यशाळेचे उद्घाटन केले. सूत्रसंचालन ॲड. विलास रामटेके व प्रास्ताविक दिलीप गझहंस यांनी केले. या कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, ॲड. विलास रामटेके, , उद्योजक शशिकांत काळे, विश्वनाथ इंगळे, गौतम धनेधर, इंजि. किशोर पाटील, रामदास अभ्यंकर, गंगाराम बोर्डे, प्रकाश सदाफुले, शेषराव हनुमंते, विश्राम राऊत, डी. एल. मोकळे, किसन मोरे, द्वारका गजहंस, मालती दंदे, लताबाई बोर्डे, मायाबाई राऊत, कलावती भालेराव, इंदुबाई बागुल, भाग्रताबाई गायकवाड, कमल हनुमंते, छाया मोकळे, सुमन नहिवळे, विश्वनाथ जाधव, रामराव सूर्यतळे, एम. बी. साळवे, किसन गणराज, अण्णाराव जाधव, दिलीप गजहंस, ज्ञानेश्वर खंदारे इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

शब्दांकन बी. बी. मेश्राम,
संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र.संपर्क : 8983082128 (Wh), 9421678628 (C) circumference१९६८@gmail.com

प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

# उमरगा तालुकास्तरीय शिक्षकांचे मूल्यवर्धन प्रशिक्षणाच्या पहिल्या टप्प्याचे उद्‌घाटन बापूराव पाटील यांच्या हस्ते संपन्न





**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे अंतर्गत जिल्हा परिषद, धाराशिव यांच्या वतीने उमरगा तालुक्यातील पहिली ते आठवी वर्गाला शिकवणाऱ्या सर्व शिक्षकांचे उमरगा तालुकास्तरीय प्रशिक्षण ता. २२ ते २४ सप्टेंबर २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. या प्रशिक्षणाच्या पहिल्या टप्प्याची सुरवात मुरूम येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात सोमवारी (ता. २२) रोजी जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकारी अमोल राजपूत होते. यावेळी पंचायत समितीचे माजी उपसभापती गोविंद पाटील, माजी नगराध्यक्ष धनराज मंगरुळे, माधवराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक सपाटे, प्रतिभा निकेतन कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य उल्हास घुरघुरे, शिक्षण विस्तार अधिकारी एस. एस. कदम, विलास कंटेकुरे, गणेश अंबर, सुरेश शेळके आदींची प्रमुख उपस्थिती होती. या मूल्यवर्धित शिक्षक प्रशिक्षणासाठी मुरूम, भुसणी, केसरजवळगा, बेळंब या चार केंद्रातील सर्व केंद्रांचे केंद्रप्रमुख, केंद्रीय शाळांचे सर्व मुख्याध्यापक, अंतर्गत घटक शाळांचे सर्व मुख्याध्यापक व इयत्ता पहिली ते आठवी वर्गाला शिकवणारे ५० टक्के शिक्षक उपस्थित होते. याप्रसंगी अध्यक्षीय समारोपप्रसंगी राजपूत म्हणाले की, सध्या सर्वत्र पावसाने हाहाकार उडालेला असताना सर्व शाळांच्या मैदानावर प्रचंड प्रमाणात पावसाचे पाणी साठलेले आहे.

अशा परिस्थितीत बापूराव पाटील यांनी या प्रशिक्षणासाठी आपल्या महाविद्यालयाची इमारत उपलब्ध करून दिल्याबद्दल तसेच नगर परिषदेच्या माध्यमातून शहरातील सर्व जिल्हा परिषद शाळेकरिता शौचालयाची उभारणी करून दिल्याबद्दल पाटील यांचे आभार मानले. या प्रशिक्षणासाठी राज्यस्तरावर प्रशिक्षित झालेले आठ सुलभक प्रशिक्षक यांची व्यवस्था करण्यात आली आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रघुवीर आरणे यांनी केले. सूत्रसंचालन बळीराम गंगणे तर आभार एस. एस. कदम यांनी मानले. या प्रशिक्षणाच्या यशस्वीतेसाठी आबाराव कांबळे यांच्यासह सर्व केंद्रांचे केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व सर्व शाळांचे सहभागी शिक्षक यांनी विशेष परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २२ सप्टेंबर २०२५



प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


## बंजारा' जातीचा अनुसूचित जमातीच्या यादीत समावेश करु नका : ट्रायबल फोरमची मागणी

**नंदुरबार** : अनुसूचित जमातीच्या यादीत 'बंजारा' जातीचा समावेश करु नये. अशी मागणी ट्रायबल फोरम नंदुरबार जिल्हाध्यक्ष नितीन तडवी यांनी केली आहे.या संदर्भात राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आदिवासी विकास मंत्री यांना निवेदन पाठविण्यात आले आहे.

हैदराबाद गॅझेट नुसार मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबत २ सप्टेंबर २०२५ रोजी राज्यशासनाने शासन निर्णय निर्गमित केला आहे.याच गॅझेटचा आधार घेऊन राज्यातील 'बंजारा' समाज आता अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करण्याची मागणी करु लागला आहे.

ही मागणी चुकीची असून असंवैधानिक आहे.भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४२ नुसार महाराष्ट्र राज्यातील क्षेत्रासंबंधात दि.६ सप्टेंबर १९५० रोजीच्या राष्ट्रपतींच्या पहिल्या आदेशात आणि त्यानंतर महाराष्ट्र राज्याच्या बाबतीत संसदेने वेळोवेळी सुधारणा केलेल्या अनुसूचित जमातीच्या याद्या सूचिबध्द केलेल्या आहेत.त्यामध्ये 'बंजारा' अशी नोंद नाहीत.

हैदराबाद गॅझेट (१९०९) मध्ये प्रृष्ठ क्र.२३४ वर बंजाराची नोंद 'इतर महत्त्वाच्या शेतकरी जाती' अशी आहेत.१९२० च्या गॅझेटमध्ये लंबाडा, बंजारा/सुगळी यांचा उल्लेख 'भटकी जमात' , 'हिंदूची जात' असाही आहेत.म्हणून ते आदिवासी होऊ शकत नाही.त्यांना आदिवासींचा दर्जा मिळू शकत नाही.'बंजारा' नोंद इतर मागास म्हणूनचबॉम्बे रिपोर्ट डिप्रेस,अँबओरिजिनल आणि बँक वर्ड क्लास सन १९३० च्या स्टार्ट कमेटीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे सुद्धा सदस्य होते.

त्या रिपोर्ट मध्ये अ.क्र.५३ वर लमानी ही जात मागासवर्गीय म्हणूनच आहे. १९५३ साली काकासाहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली मागासवर्ग आयोगाची स्थापना केली होती. त्यात पूर्वीच्या मध्य भारतात इतर मागासवर्ग जातीच्या यादीत क्र.५ वर 'बंजारा' जातीचा उल्लेख आहे. मुंबई राज्याच्या यादीत 'लंबाडा' या जातीचा इतर मागासवर्ग जातीच्या यादीत क्र.२१४ वर समावेश आहे.

बंजारा'चा प्रस्ताव मागे घेतलाराज्यशासनाने राजकीय दबावापोटी १२ जून १९७९ रोजी 'बंजारा' जातीचा अनुसूचित जमातीच्या यादीत समावेश करण्यासाठी केंद्र शासनाला प्रस्ताव पाठविण्यात आला होता. 'बंजारा' समाज आदिवासींचे निकष पूर्ण करीत नसल्यामुळे राज्य शासनाने ६ नोव्हेंबर १९८१ रोजी स्वत: चाच प्रस्ताव पूर्ण विचारांती मागे घेतला आहे."

केंद्र शासनाने २६ फेब्रुवारी १९८१ रोजी एखाद्या जातीचा अनुसूचित जमातीत समावेश करण्यासाठी प्राचीन जीवनमान,भौगोलिक अलिप्तता,भिन्न संस्कृती, स्वभावातील बुजरेपणा, मागासलेपणा हे पाच निकष निर्धारित केले आहे.हे निकष 'बंजारा' समाज पूर्ण करीत नाही.त्यामुळे त्यांना आदिवासींचा दर्जा मिळू शकत नाही.

**नितीन तडवी**
जिल्हाध्यक्ष, ट्रायबल फोरम
नंदुरबार.

## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प स्थलांतरित करण्याचा हट्ट म्हणजे मतांची पोळी कुठे भाजते ते पाहणे?



**बुलढाणा (महेश मुंढे)** किनगाव राजा -- गेल्या काही वर्षापासून गावाच्या विकासासाठी सौर ऊर्जा प्रकल्पावर ग्रामपंचायतचे निस्वार्थपणे काम सुरू आहे आणि ग्रामपंचायतला त्यात यश मिळाले सौर ऊर्जा प्रकल्प मंजूर झाला ग्रामपंचायत किनगाव राजा यांना शासकीय गट क्र. ५२५ ही जागा प्रकल्पासाठी शासनाकडून दिनांक २४ एप्रिल २०२५ ला अधीक्षक अभियंता स.व.सु.मंडळ कार्यालय,महावितरण बुलढाणा यांना तीस वर्षासाठी भाडेपट्ट्याने प्रदान करण्यासाठी मान्यता देण्यात आली यामध्ये उपवनसंरक्षक बुलढाणा यांनी या जागेसाठी ना हरकत दिली आहे, जिल्हा खनीकरण अधिकारी बुलढाणा यांनीही या जागेसाठी ना हरकत दिले आहे,कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग यांनीही विहित अटींच्या आधीन राहून न हरकत दिली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग बुलढाणा यांनीही या गटाला ना हरकत दिली आहे. उद्योग ऊर्जा व कामगार विभागाकडीलडील शासन निर्णय क्र. सौर प्र.२०१६ / प्र.क्र. 354 / ऊर्जा ७ दि.१४ -६ -२०१७ द्वारेमुख्यमंत्री सौर कृषी वाहिनीस मान्यता मिळालेली आहे , महसूल वन विभागाने ही शासन निर्णय क्रमांक २०१७ / प्र.१९७ /१ नुसार मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्पासाठी गट क्र.५२५ ला मान्यता दिली आहे ही सर्व माहिती स्थानिक नागरिकांना न देता फक्त गट क्रमांक ५२५ मध्ये मालकी हक्क देण्याचे आश्वासन देऊन आंदोलनाकरिता प्रोत्साहित करणे म्हणजे सरळ सरळ जनतेला फसवण्याचा आणि राजकीय स्वार्थ साधण्याचा भाग म्हणावा का? ग्रामपंचायत किनगाव राजा यांनी या प्रकल्पासाठी खूप प्रयत्न केले आणि एखादा प्रकल्प किंवा योजना गावात आणणे म्हणजे चार दोन महिन्याचे काम नसून वर्षानुवर्षे यासाठी प्रयत्न करावे लागतात मग इतकी वर्षे गरीब जनतेचे प्रश्न का दिसले नाहीत? जेव्हा प्रकल्प मंजूर झाला व प्रकल्पाचे काम सुरू करायचे ग्रामस्थांना रोजगारांच्या संधी दिसू लागल्या, बेरोजगारांना रोजगाराच्या संधी दिसू लागल्या तेव्हाच हे राजकारण का? सौर ऊर्जा प्रकल्पामुळे रोजगार पायाभूत सुविधा आणि गावाच्या विकासाचा मार्ग मोकळा होणार आहे पण त्यात अचानक "स्थलांतर "हा शब्द उच्चारून गरीब जनतेला जागा मिळवून देण्याचे आमिश दाखवून गावाच्या विकासावर पाणी फिरवण्याचा प्रयत्न करत आहेत का?

प्रत्यक्षात सौर ऊर्जा प्रकल्पासाठी मोठी पायाभूत सुविधा स्थलांतरित करणे हे खर्चिक आणि अव्यवहार्य असते, त्यामुळे जर कोणी असे निर्णय घेत असतील तर त्या मागे तांत्रिक कारणापेक्षा राजकीय कारणेच अधिक दिसू लागतात. सौर ऊर्जा प्रकल्प हा स्वच्छ, शाश्वत आणि भविष्यातील गरज भागविणारी सुविधा-व्यवस्था आहे, त्यामुळे अशा प्रकल्पांचे नियोजन करताना शास्त्रीय अभ्यास, भौगोलिक परिस्थिती, आणि तांत्रिकी संगती लक्षात घेतली जाते व शासकीय राजपत्रे शासकीय ना हरकत प्रमाणपत्र यांच्या आधारेच प्रकल्पाला नियोजित जागा देऊन मान्यता दिली जाते, हे सर्व झालेले असताना अचानक "स्थलांतर " म्हणजे केवळ राजकीय हेतूच असू शकतो.

सामान्य जनतेला ही ह्या गोष्टी सांगायला हव्यात कारण यात आपलाच करापोटी भरलेला पैसा लागलेला असतो, स्थलांतरामुळे पहिला फटका बसतो तो खर्चावर. आधीच कोट्यावधी रुपये गुंतवणूक करून केलेल्या प्रकल्पांना थांबवणे व नवीन ठिकाण गाठणे म्हणजे करदात्यांच्या पैशाचा अपव्यय, दुसरा परिणाम म्हणजे विलंब. हवामान बदल आणि ऊर्जापुरवठ्याचा गंभीर आव्हानासमोर उभ्या असलेल्या महाराष्ट्राला वेळ वाया घालवण्याची मुभा नाही, तिसरा आणि सर्वात मोठा धोकादायक परिणाम म्हणजे विश्वासहानी. सौर प्रकल्पांच्या भागीदारीत अशा हालचालींमुळे महाराष्ट्राचीच नव्हे तर आपल्या देशाची ही विश्वासाहर्ता डळमळीत होते. लोकशाहीत राजकारण अपरिहार्य आहे मात्र सौर ऊर्जा प्रकल्पांसारख्या राष्ट्रीय महत्त्वाच्या योजना राजकारणासाठी वापरणे हे भविष्यासाठी घातक ठरू शकते पर्यावरण पूरक ऊर्जेच्या क्षेत्रातील प्रत्येक निर्णय पारदर्शक, वैज्ञानिक व लोक हितकारी असणे हेच खरे नेतृत्व ठरते. एका बाजूला हरित ऊर्जा, प्रदूषण कमी करणे, शाश्वत विकास तर दुसऱ्या बाजूला शासनाने ठरवून दिलेल्या जागेवरून दुसऱ्या जागेवर प्रकल्प " स्थलांतरित " करणे म्हणजे विकास कामांचा विध्वंस असून करदात्यांच्या पैशांचा उघड उघड अपव्यय आहे.

सामान्य जनतेला हे समजावून सांगितले पाहिजे की सौर ऊर्जा प्रकल्प हा केवळ लोखंड सिमेंट आणि पॅनल्स ने रचलेले बांधकाम नाही तर आपल्या भविष्यासाठीचा प्रकाशासाठीचा दीपस्तंभ आहे. सौर ऊर्जा प्रकल्प स्थलांतरित करणे म्हणजे केवळ जागा बदलणे एवढेच नाही हे गावाच्या भविष्यासाठी, रोजगारासाठी, गुंतवणुकीसाठी, गावाच्या प्रगतीसाठी घातक ठरू शकते, इथे केवळ शासकीय जागेसाठी विरोध होत आहे तेव्हा स्थानिक नागरिकांना हे आपल्या भविष्यासाठी, प्रगतीसाठी, भल्यासाठीच होत आहे केवळ जागेसाठी या प्रकल्पाला विरोध करू नये हे विश्वासात घेऊन सांगणेही महत्त्वाचे आहे

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २३ सप्टेंबर २०२५

# आंतरराष्ट्रीय सांकेतिक भाषा दिन : संवाद व समानतेचा नवा मार्ग

मानव समाजाचा पाया संवादावर आधारलेला आहे. मानवाच्या जीवनात संवादाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. संवादाशिवाय समाजजीवनाची कल्पना करणे अशक्य आहे. भाषा ही फक्त विचार व्यक्त करण्याचे साधन नसून ती समाजातील परस्परसंबंधांची, सांस्कृतिक अभिव्यक्तीची आणि ओळखीची मूलभूत गरज आहे. भाषा ही फक्त बोलली जाणारी किंवा लिहिली जाणारी साधनं नसतात, तर ती समाजाला जोडणारे, विचारांना दिशा देणारे आणि व्यक्तिमत्त्वाला आकार देणारे सामर्थ्यवान माध्यम असते. जगातील प्रत्येक समाजाने आपल्या गरजेनुसार वेगवेगळ्या भाषांची निर्मिती केली आहे. परंतु जगातील काही व्यक्तींना सर्वांना बोलण्याची किंवा ऐकण्याची क्षमता समान प्रमाणात लाभलेली नसते. अशा व्यक्तींना समाजाशी नाळ जोडण्यासाठी जी विशेष भाषा विकसित झाली, तिला आपण सांकेतिक भाषा असे म्हणतो. ही भाषा केवळ हातवारे किंवा हावभाव नसून ती एक स्वतंत्र व्याकरण आणि संरचना असलेली समृद्ध भाषा आहे. बहिऱ्या व्यक्तींसाठी सांकेतिक भाषा हीच जगण्याची भाषा ठरते. त्यामुळे सांकेतिक भाषेचा स्वीकार व प्रसार हा केवळ भाषिक प्रश्न नसून सामाजिक न्याय, समानता आणि समावेशक विकासाशी निगडित आहे. या भाषेच्या महत्त्वाची जाणीव करून देण्यासाठी आणि जगभरातील बहिऱ्या व्यक्तींच्या भाषिक व सांस्कृतिक अधिकारांना मान्यता देण्यासाठी दरवर्षी २३ सप्टेंबर रोजी 'आंतरराष्ट्रीय सांकेतिक भाषा दिन' साजरा केला जातो.

२०१७ मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेने या दिनाची घोषणा केली. ही तारीख निवडण्यामागे विशेष कारण आहे ते म्हणजे १९५१ साली याच दिवशी जागतिक बहिरे महासंघाची स्थापना झाली होती. त्यामुळे या दिवसाला ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व लाभले आहे. या दिवसाचा उद्देश जगातील सर्व बहिरे व्यक्तींना शिक्षण, नोकरी, आरोग्य, न्याय, सांस्कृतिक सहभाग यांसारख्या जीवनातील प्रत्येक क्षेत्रात समान संधी मिळावी. 'कोणीही व्यक्ती मागे राहू नये' ही संकल्पना प्रत्यक्षात आणणे हा या दिवसाचा केंद्रबिंदू आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीला आपले विचार मोकळेपणाने व्यक्त करण्याचा अधिकार आहे. परंतु संवाद साधण्यासाठी जर आवश्यक माध्यमच नसेल, तर तो व्यक्ती उपेक्षित राहतो. सांकेतिक भाषा ही दरी भरून काढते आणि संवाद व समानतेचा नवा मार्ग उभारते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, कोणतीही भाषा ही फक्त संवादाचे साधन राहत नाही; ती सामाजिक संरचनेत व्यक्तीच्या स्थानाचे, अधिकारांचे आणि सामूहिक ओळखीचे प्रतिक बनते. म्हणूनच सांकेतिक भाषेला मान्यता देणे म्हणजे बहिऱ्या समाजाच्या अस्तित्वाला आणि त्यांच्या सांस्कृतिक ओळखीला मान्यता देणे होय.

समाजशास्त्रातील संरचनात्मक प्रकार्यवाद या दृष्टिकोनातून पाहता, प्रत्येक समाजातील घटकाची भूमिका ठरलेली असते. भाषा हा घटक समाजाच्या एकात्मतेसाठी अत्यावश्यक आहे. परंतु जेव्हा एखाद्या गटाला म्हणजेच येथे बहिऱ्या समाजाला सामान्य भाषेपासून वंचित ठेवले जाते, तेव्हा त्यांचा समाजातील सहभाग मर्यादित होतो. यामुळे समाजाच्या कार्यक्षमतेवरही परिणाम होतो. म्हणूनच सांकेतिक भाषेचा प्रसार हा फक्त त्या गटाच्या फायद्यासाठी नव्हे तर संपूर्ण समाजाच्या संतुलनासाठी आवश्यक आहे. संघर्ष सिद्धांत देखील या संदर्भात महत्त्वाचा आहे. समाजातील संसाधनांचे व अधिकारांचे वितरण हे नेहमीच समसमान नसते. बहिरे व्यक्ती ऐकणाऱ्या बहुसंख्याक समाजाच्या तुलनेत दुय्यम ठरतात. शैक्षणिक संस्था, रोजगारक्षेत्र, न्यायव्यवस्था, आरोग्यसेवा या सर्व ठिकाणी त्यांना संवादातील अडथळ्यांमुळे समान संधी मिळत नाही. ही असमानता केवळ शारीरिक मर्यादेमुळे नाही, तर सामाजिक रचनेमुळे टिकून राहते. सांकेतिक भाषेला अधिकृत मान्यता मिळाली तर या असमानतेत घट करता येईल. प्रतीकात्मक आंतरक्रीयावाद या दृष्टिकोनातून विचार केला तर भाषा म्हणजे फक्त माहिती देण्याचे साधन नाही, तर सामाजिक परस्परसंवादाची किल्ली आहे. एखाद्या बहिऱ्या मुलाच्या दैनंदिन जीवनाचा विचार केला तर त्याला घरात, शाळेत, समाजात संवाद साधणे कठीण जाते. त्याचे स्वत:चे अनुभव, भावना व्यक्त करणे कठीण बनते. त्यामुळे त्याची सामाजिक ओळख दुय्यम ठरते. जेव्हा त्याला सांकेतिक भाषेत संवाद साधता येतो, तेव्हा त्याची सामाजिक भूमिका दृढ होते आणि आत्मसन्मान वाढतो.

शैक्षणिक क्षेत्रात पाहिले तर सामाजिक भांडवल सिद्धांत उपयुक्त ठरतो. जेव्हा मुलांना समान शैक्षणिक संसाधने मिळत नाहीत, तेव्हा त्यांची सामाजिक भांडवल साठवण्याची क्षमता कमी होते. बहिऱ्या मुलांना सांकेतिक भाषेत दर्जेदार शिक्षण दिले गेले, तर ते पुढे उच्च शिक्षण, रोजगार आणि सामाजिक नेतृत्वात सहभाग घेऊ शकतात. त्यामुळे समाजात समान संधी आणि सामाजिक गतिशीलता वाढेल. बहिऱ्या समाजाला अनेक वर्षे शिक्षणापासून दूर ठेवले गेले. कारण त्यांच्यासाठी स्वतंत्र अभ्यासपद्धती, शिक्षकांची प्रशिक्षण व्यवस्था, शैक्षणिक साधनसामग्री यांची कमतरता होती. परंतु आज परिस्थिती हळूहळू बदलत आहे. जगभरातील अनेक देशांमध्ये सांकेतिक भाषेला अधिकृत मान्यता मिळाली आहे. संयुक्त राष्ट्र संघानेही हे स्पष्ट केले आहे की, सांकेतिक भाषा ही पूर्ण भाषा आहे आणि तिचा प्रसार व वापर वाढविण्यासाठी सरकारांनी ठोस धोरण आखले पाहिजे. सांस्कृतिक समाजशास्त्राच्या दृष्टिकोनातून पाहता, सांकेतिक भाषा ही बहिऱ्या समाजाची सांस्कृतिक ओळख आहे. त्यांच्या साहित्यनिर्मिती, कलाविष्कार, नृत्य, नाट्य या सर्व गोष्टींमध्ये सांकेतिक भाषेचा सहभाग दिसून येतो. त्यामुळे या भाषेला मान्यता नाकारणे म्हणजे त्यांच्या संस्कृतीला नाकारणे होय. म्हणूनच जगातील अनेक देशांनी सांकेतिक भाषेला घटनात्मक मान्यता दिली आहे. भारतातही "इंडियन साइन लँग्वेज रिसर्च अँड ट्रेनिंग सेंटर" द्वारे प्रयत्न होत आहेत, परंतु त्याचा विस्तार आवश्यक आहे.

तंत्रज्ञानाने या क्षेत्रात नवे दालन उघडले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने भाषांतर करणारी उपकरणे, मोबाईल ॲप्स, ऑनलाइन शिक्षण साधने उपलब्ध होत आहेत. यामुळे संवादातील अडथळे काही प्रमाणात दूर झाले आहेत. पण समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, फक्त तांत्रिक साधनं पुरेशी नसतात. जोपर्यंत सामाजिक मानसिकता बदलत नाही, तोपर्यंत समावेशक समाज उभा राहत नाही. बहिरे नागरिकांना 'अक्षम' म्हणून पाहण्याची वृत्ती बदलून त्यांना 'समान हक्काचे नागरिक' म्हणून मान्यता देणे हे खरी सामाजिक प्रगतीचे लक्षण आहे. समाजशास्त्रात मानवी हक्कांचा दृष्टीकोन महत्त्वाचा आहे. प्रत्येक व्यक्तीला शिक्षण, रोजगार, आरोग्य, संस्कृतीत सहभाग या सर्व हक्कांचा लाभ मिळाला पाहिजे. जर संवाद साधण्यासाठी मूलभूत साधनच उपलब्ध नसेल, तर हे हक्क केवळ कागदावर राहतात. सांकेतिक भाषा या हक्कांना वास्तवात आणते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय सांकेतिक भाषा दिन हा मुळात मानवी हक्कांचा, सामाजिक न्यायाचा आणि समानतेचा दिवस आहे.

भारतातील परिस्थिती विशेष लक्षवेधी आहे. अनेक मुकबधीर नागरिक भारतात आहेत. परंतु अजूनही ग्रामीण व शहरी भागांमध्ये संवादाची दरी मोठी आहे. शाळांमध्ये प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता, शैक्षणिक साहित्याचा अभाव, सार्वजनिक ठिकाणी सांकेतिक भाषेची सोय नसणे, न्यायालयीन प्रक्रियेत दुभाष्यांची अनुपस्थिती यामुळे बहिरे नागरिक समाजजीवनात पूर्ण सहभाग घेऊ शकत नाहीत. या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय सांकेतिक भाषा दिन हा केवळ औपचारिक उत्सव न राहता सामाजिक जागरूकतेचे आंदोलन ठरले पाहिजे. या पार्श्वभूमीवर समाजाने काही ठोस पावले उचलणे आवश्यक आहे. शाळा-महाविद्यालयांमध्ये ऐच्छिक विषय म्हणून सांकेतिक भाषा शिकवावी. सरकारी कार्यालये, न्यायालये, रुग्णालये, रेल्वे स्थानके यांसारख्या ठिकाणी दुभाष्यांची सोय असावी. माध्यमांनी सर्व कार्यक्रमांसाठी सांकेतिक भाषेतील अनुवाद उपलब्ध करून द्यावा. समाजातील सामान्य नागरिकांनीही या भाषेचा अभ्यास करून मुकबधीर समाजाशी संवाद साधण्याचा प्रयत्न करावा. आंतरराष्ट्रीय सांकेतिक भाषा दिन आपल्याला सतत हे स्मरण करून देतो की 'समावेशक समाज हा केवळ आर्थिक विकासावर उभा राहत नाही, तर संवादाच्या समान संधींवर उभा राहतो.' समाजातील कोणत्याही घटकाला वगळून लोकशाही पूर्णत्वाला पोहोचत नाही. म्हणूनच या दिवसाचे समाजशास्त्रीय महत्त्व अधिक अधोरेखित होते.

शेवटी असे म्हणता येईल की, आंतरराष्ट्रीय सांकेतिक भाषा दिन म्हणजे केवळ एका भाषेचा गौरव नव्हे, तर सामाजिक समता, सांस्कृतिक ओळख, मानवी हक्क आणि समावेशक विकासाचा सेतू आहे. जोपर्यंत समाजातील प्रत्येक नागरिकाला आपले विचार व्यक्त करण्याची व समाजजीवनात सक्रिय सहभाग घेण्याची संधी मिळत नाही, तोपर्यंत खरी लोकशाही साकार होणार नाही. सांकेतिक भाषेचा स्वीकार हा त्या दिशेने टाकलेला महत्वाचा टप्पा आहे.



डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. क्र. ९९६०१०३५८२, ईमेल — bagate.rajendra5@gmail.com